Exh.1/C

क्रि.अर्ज नं.55 /२०२६

काागल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

यांचे न्यायालयात....

मेसर्स वरद पॅकेजिंग तर्फे

संदीप अण्णाप्पा ठीकणे

व.व.४३, धंदा : व्यवसाय.

रा.चिंचवाड,ता.करवीर,जि.कोल्हापूर अर्जदार

विरुद्ध

महाराष्ट्र सरकार तर्फे

राज्य उत्पादन शुल्क विभाग वि.प

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४५७/५०३

(क्रिमिनल प्रोसीजर कोड कलम ४५७/४५८) प्रमाणे मुद्देमाल मिळविणेसाठी अर्ज.

कागल पोलीस स्टेशन

गु.र.नं. ०८/२०२६

भा.दं.वि. कलम ३७९, ३४ प्रमाणे

Order

------

Call Say of IO and APP

<u>यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज की,</u>

१. यातील अर्जदार हे वर नमूद पत्त्यावर कायमपणे राहणेस आहेत.

२. यातील अर्जदार हे खालील नमूद पेपर कॉरीगेटेडबोर्ड 'बॉक्स मेकिंग मशीन आणि त्याचे स्पेअर पार्टस आदी मुद्देमालाचे कायदेशीर मालक असून, प्रस्तुत कामी अर्जदार यांच्या मालकीचा मुद्देमाल हा राज्य उत्पादन शुल्क विभाग तर्फे अधिकारी यांनी गुन्हा रजिस्टर नं.०८/२०२६ चे गुन्ह्याचे कामी जप्त केलेला असुन, तो सदर राज्य उत्पादन विभाग यांचे अधिकारी यांनी जप्त करून सील बंद अवस्थेत ठेवला आहे. सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांच्याच मालकीचा असून अर्जदार यांना निर्माण झाले कौटुंबिक आर्थिक अडचणी मधून बाहेर

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

पडणे करिता सदर मशिनरी वापरणे करिता संजय दत्ताराम साळगावकर यांना वापरणे करिता दिले होते त्याप्रमाणे अर्जदार यांचेकडून संजय दत्ताराम साळगावकर यांनी सदर मशिनरी हे वापरणे करिता घेतलेले होते त्यामुळे सदर मशिनरी हे दैनंदिन वापरातील मशिनरी आहेत.

३. सदर पोलीसां मार्फत जप्त अवस्थेत असलेल्या मुद्देमालाचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | तपशिल | किंमत |
|---|---|---|
| १. | Rotary Auto Sheet Cutter with Heavy Duty 01 Creas Box Counter Delivery Conveyor Belt (Inner Box with 2 HP Motor Complete 54") | 4,50,000/- |
| २. | Heavy Duty 4 Bar Rotary Creasing & Cutting Machine with 1 set of Creasing Heads, 4 Sets of Cutting Heads with 2HP Motor Complete Size - 85" | 4,50,000/- |
| ३. | Heavy Duty Eccentric Slotter with 3 Slotting Heads 1 corner Head Slot depth 18" With Motor Complete size - 85" | 4,50,000/- |
| ४. | Heavy Duty Oblique Type High Speed Single Facer Paper Corrugating M/c. with One Set of M Flute Rollers Fitted On Roller Bearing One Pre Heater 3 Heaters with Motor Complete 52" | 15,80,000/- |
| ५. | Hydraulic Self Loading Reel Stand with Standard Accessories For 52" | 5,00,000/- |
| ६. | AC Drive Panel And Shetter for corrugation Machine and Sheet Cutter for 52" | 2,15,000/- |

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

| | | |
|---|---|---|
| ७ | **Heavy Duty Sheet Pasting Machine with 1 HP Motor Complete 85"** | **2,25,000/-** |
| | | |

४. वर वर्णन केलेला जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांच्या मालकीचा असून त्यांच्या दैनंदिन वापरातील आहे. सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांना यांचेकडे परत मिळावा, यासाठी कारणे खालीलप्रमाणे –

अ) गु.र.नं ८/२०२६ चे कामी घटनास्थळा वरून जप्त केलेले मशीनरी-मुद्देमाल हा अर्जदार यांचे मालकीचा आहे आणि तो आहे त्या स्थितीत एक वर्षाचे कालावधी करिता नफा तत्वावर संजय दत्ताराम साळगावकर यांना वापरणे करिता दिले होते आणि त्याचाच भाग म्हणून सुरवातीस संजय दत्ताराम साळगावकर ने ठराविक रक्कम देखील अदा केली होती. त्यामुळे गेल्या सहा महिन्यापासून सदर गोडाऊन व मशीनरी संजय दत्ताराम साळगावकर वापरत होता.

आ) वर नमूद जप्त मुद्देमाल बाबत अर्जदार व संजय दत्ताराम साळगावकर यांचे दरम्यान तसा लेखी करार झाला नव्हता. संजय दत्ताराम साळगावकर सदर जागा व मशनरी कोणत्या कारणासाठी वापरत होता याबाबत अर्जदार पासून संजय दत्ताराम साळगावकर याने लपवून ठेवले होते. त्यामुळे अर्जदार यांचा गु.र.नं ८/२०२६ मधील गुन्ह्याशी कोणताही सबंध नव्हता व नाही केवळ सदर मशीनरी या अर्जदाराचे मालकीच्या होत्या म्हणून त्यांना आरोपी केलेले आहे

इ) सदरचा जप्त मुद्देमाल हा गेल्या अनेक दिवसांपासून सील बंद अवस्थेत पडून आहे. त्यामुळे सदरचा मुद्देमाल आणखी पुढील दिवस बंद अवस्थेत राहिल्यास सदर मुद्देमालाचे नुकसान होणार आहे. सदर मशिनरी बंद अवस्थेत राहिलेस त्याचा दुरुस्ती खर्च देखभाल याचा खर्च खूप मोठ्या प्रमाणात असलेने अर्जदार यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होणार आहे.

ई) सदर जप्त मुद्देमाल हा व्यवसायातील दैनंदिन वापरासाठी आवश्यक असल्याने, अर्जदार यांचा व्यवसाय हा या मुद्देमालावर निर्भर असलेमुळे अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे सदर मशिनरीचा ताबा मिळणे आवश्यक व गरजेचे आहे. तसेच सदर मशीन पडून असल्याने अर्जदार यांचे दैनंदिन आर्थिक नुकसान होत आहे.

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

उ) सदर जप्त मुद्देमाल अर्जदार यांना बॉण्डवर ताबेत दिल्यास त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल अथवा फेरफार करणार नाही किंवा त्याची विक्री अगर तबदील करणार नाही.

ऊ) सदर जप्त मुद्देमाल अर्जदार यांना बॉण्डवर ताबेत दिल्यास मे. कोर्ट आदेश करील त्यावेळी अर्जदार हे मे. कोर्टात हजर करण्यास तयार आहेत.

ऋ) सदर जप्त मुद्देमाल बॉण्डवर ताबेत दिल्यास अर्जदार हे मे. कोर्टाच्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहेत.

ऌ) सदर जप्त मुद्देमालाच्या मालकी हक्काच्या कागदोपत्री अर्जदार यांच्या नावाची नोंद आहे.

एॅ) सदर जप्त मुद्देमालाच्या मालकीविषयी त्यांचे बिलाची प्रत सादर केली आहे.

ऐ) सदर मशिनरीचा मुद्देमाल हा जप्त राहिल्यास सदर मशिनरी या खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५. **<u>सबब अर्जदार यांची विनंती की,</u>**

अ) अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

आ)सदरचा जप्त वर अर्जातील नमूद मुद्देमाल हा अर्जदार यांना मे. कोर्टाने बॉण्डवर ताबेत देण्याचा हुकूम द्यावा.

इ) जरुर तर अर्ज दुरुस्तीस परवानगी मिळावी.

**कोल्हापूर**

**ता. २/०४/२०२६**

**अर्जदार**

VARAD PACKAGING

Proprietor

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

# ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार मेसर्स वरद पॅकेजिंग तर्फे संदीप अण्णाप्पा ठीकणे व.व.४३, धंदा:शेती, रा.चिंचवाड, ता.करवीर, जि.कोल्हापुर लेखाने देवाच्या शपथेवर असे नमूद करतो की, वरनमूद अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे पूर्णपणे खरा व बरोबर आहे.म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु.कोल्हापूर. ता. ८/०४/२०२६

I know the Deponent

Adv. S.N. Mendagule

VARAD PACKAGING

Proprietor

# प्रतिज्ञा

मी उपरोक्त ॲफिडेव्हीट करणार सत्य प्रतिज्ञेवर असे नमूद करतो की, वरनमूद अर्जातील व त्याखालील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे पूर्णपणे खरा व बरोबर आहे.म्हणून केली प्रतिज्ञा आज मु.कोल्हापूर.ता. ८/०४/२०२६

VARAD PACKAGING

Proprietor

Solemnly affirmed before me by
Shri. Sandip Aannappa Thikane
Age 43 Occup. Agri.
R/o Chinchawad, Tal. Karvir. Dist. Kolhapur
who is identified by Shri S.N.
Mendgule, Adv. whom
personally know.
Dates 08/04/2026

Assistant Superintende
Chief Judicial Magistrate Co
Kolhapur.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.05.02 15:16:38 +0530